Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
१२.०६.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १३२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### १५ जूनपासून महापालिका शाळांचे शैक्षणिक वर्ष प्रारंभ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सोमवार, दि.१५ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात येणार आहे. शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरावा यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष 'शाळा प्रवेशोत्सव' साजरा करण्यात येणार असून विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, फुले आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत केले जाणार आहे. प्रवेश-ोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे तसेच पालकांचा सहभाग वाढविणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

# आता १८० ऐवजी १९५ मिनिटांचा पेपर

## २१ जूनच्या परीक्षेसाठी 'एनटीए'कडून वाढवला वेळ, रफ कामाची पानेही वाढवली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** - वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'नीट' परीक्षा पेपरफुटीच्या वादामुळे रद्द करण्यात आली होती.

त्यानंतर आता जाहीर झालेल्या नीट फेरपरीक्षेसाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. पेपरफुटीमुळे मानसिक आणि शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागलेल्या विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी एनटीएने परीक्षेच्या वेळेत बदल केला असून, आता विद्यार्थ्यांना १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्याचा निर्णय घेतला आहे.

हा निर्णय अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेऊन घेण्यात आला असून, यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

परीक्षेची नवीन वेळ आणि 'रफ वर्क'साठी अतिरिक्त जागा एनटीएने दिलेल्या माहितीनुसार, २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या या फेरपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांना पूर्वी मिळणाऱ्या १८० मिनिटांऐवजी (३ तास) आता तब्बल १९५ मिनिटांचा (३ तास १५ मिनिटे) वेळ मिळणार आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार ही परीक्षा दुपारी २:०० वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ५:१५ वाजेपर्यंत चालेल. वेळेसोबतच विद्यार्थ्यांनी गणितीय आणि वैज्ञानिक सुटसुटीत आकडेमोड करावी, यासाठी प्रश्नपत्रिकेत 'रफ कामा'साठी दिलेली पानांची संख्या २ वरून थेट ४ करण्यात आली आहे.

नीट परीक्षा रद्द होण्याची 'ही' होती मुख्य कारणे : ३ मे रोजी झालेली नीट परीक्षा पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणांमुळे रद्द करण्याची नामुष्की एनटीएवर आली होती. या चौकशीत खालील धक्कादायक बाबी समोर आल्या होत्या:

गेस पेपरचे संशयास्पद वाटप : राजस्थानमधील सीकर येथे परीक्षेपूर्वीच एक 'गेस पेपर' मोठ्या प्रमाणावर वाटण्यात आला होता, ज्यामध्ये एकूण ४१० प्रश्न होते. प्रश्नांमधील कमालीचे साधर्म्य : मुख्य परीक्षेचा पेपर समोर आल्यानंतर या गेस पेपरमधील १२० ते १३५ प्रश्न मुख्य परीक्षेत जसेच्या तसे आल्याचे उघड झाले.

रसायनशास्त्राचे प्रश्न : यामधील बहुतांश प्रश्न हे 'केमिस्ट्री' (रसायनशास्त्र) या विषयाचे होते. चौकशीअंती निर्णय : हा प्रकार केवळ एक योगायोग की थेट पेपरफुटी, याची उच्चस्तरीय प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्या अहवालातील गंभीर बाबींवरून अखेर ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होऊ नये, यासाठी एनटीएने विविध प्रश्नांचे सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे:

१. पुन्हा रजिस्ट्रेशन करावे लागेल का? नाही. विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेसाठी नव्याने अर्ज किंवा नोंदणी करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. एनटीएकडे असलेला जुना डेटाच यापुढील प्रक्रियेसाठी वापरला जाईल.

# २०२७ पर्यंत 'एल निनो'चे संकट, महाराष्ट्रावर काय होणार परिणाम?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितला 'ॲक्शन प्लॅन'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - जागतिक हवामानावर मोठा परिणाम करणाऱ्या प्रशांत महासागरात आता 'एल निनो' सक्रिय झाल्याची अधिकृत घोषणा अमेरिकेच्या 'नोआ' या संस्थेच्या 'क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरने' केली आहे.

यंदाचा एल निनो हा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र असण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून, याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील मान्सून आणि शेतीवर होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठी तयारी सुरू केली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना घाईगडबडीत पेरण्या न करता सरकारी सल्ल्यानुसारच पावले टाकण्याचे आवाहन केले आहे. फेब्रुवारी २०२७ पर्यंत संकट कायम राहण्याचा अंदाज

क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरने गुरुवारी जारी केलेल्या अंदाजानुसार, प्रशांत महासागरातील न्यूट्रल स्थिती संपून आता एल निनो पूर्णपणे विकसित झाला आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत हा एल निनो अति तीव्र स्वरूपाचा होणार असून, फेब्रुवारी २०२७ मध्येही तो सक्रिय राहण्याची शक्यता ९० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या जागतिक हवामान बदलामुळे दक्षिण आशियात आणि विशेषतः भारतात पाऊस कमी पडण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'एल निनो संदर्भात आपण तयारी करत आहोत. मी माझ्या बजेटच्या भाषणामध्येच एल निनो संदर्भात वाच्यता केली होती. त्याचा मोठा परिणाम आपल्या राज्यावर होईल. त्यामुळे त्याची तयारी आपण सुरू केलेली आहे. आपण टास्क फोर्स तयार केला आहे. जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर कशी पूर्ण करता येतील हा आपला प्रयत्न आहे.

# पंतप्रधानांनी २५ कोटी लोकांना तीव्र गरीबीतून बाहेर काढलं, हा दशकातील चमत्कार, मोदी हे केवळ लाँगेस्ट नव्हे तर फायनेस्ट पंतप्रधान

## देवेंद्र फडणीवसांकडून भरभरून स्तुतीसुमनं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** - देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ वर्ष पंतप्रधान पदाची कारकिर्द पूर्ण केलीय. हे करत असताना ४ हजार ३९८ दिवस हा लॉगेस्ट इलेक्टेड पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा विक्रम मोडीत काढला. महाराष्ट्राच्या १४ कोटी जनतेच्या वतीने त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. कारकिर्द लांब आहे, यासाठी महत्त्वाची नाही तर जगाच्या पाठीवर भारताची पत वाढवण्याचे काम त्यांनी केले आहे. एनडीए सर्वात मोठा समूह म्हणून २२ राज्यात सरकार चालवत आहे. देशाच्या ८० टक्के भूभागावर एनडीए शासित राज्य सरकार आहेत. काँग्रेसला यश मिळालं नव्हतं, त्याहून अधिक एनडीएला प्राप्त झालं आहे. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जन्मभूमीत भाजपचे सरकार आले, त्यामुळे आम्ही अधिक आनंदीत आहोत. पंतप्रधानांनी २५ कोटी लोकांना तीव्र गरीबीतून बाहेर काढलं, हा या दशकातील चमत्कार आहे. शिवाय मोदी हे केवळ लाँगेस्ट नव्हे, तर फायनेस्ट पंतप्रधान आहे. असं म्हणत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांनी पंतप्रधान मोदींचं भरभरून कौतुक केलं आहे.

भारत ५ ट्रिलियन डॉलर्सच्या दृष्टीने पुढे जातोय, सेमिकंडक्टरमध्ये भारत वैश्विक होतोय १२ वर्षाच्या कार्यकाळात ३२ आंतरराष्ट्रीय सन्मान मिळालेत, त्यातील २२ सर्वोच्च सन्मान आहेत. देशाची डायव्हर्सिटी बघितली तर भारताच्या नेतृत्वावर विश्वास दिसतो आहे. असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. आपण ५ ट्रिलियन डॉलर्सच्या दृष्टीने पुढे जात आहे. ८४ टक्के कर एकाच वेळी आपण भरुन काढू शकतो.

## यंदाचा एल निनो तीव्र रूप धारण करणार

# तो भयंकर आणि खर्चिक ठरण्याची शास्त्रज्ञांना भीती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वॉशिंग्टन** - निसर्गाचा एक अनाकलनीय हवामान घटक असलेला 'एल निनो' प्रशांत महासागराच्या वाढलेल्या तापमानामुळे सक्रिय झाला असून, तो ऐतिहासिक पातळीवर तीव्र रूप धारण करण्याची शक्यता आहे, अशी घोषणा हवामानशास्त्रज्ञांनी गुरुवारी केली.

हवामान शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार, यंदाचा 'एल निनो' १९९७ मधील विक्रमी 'एल निनो'च्या बरोबरीचा किंवा त्यापेक्षाही अधिक तीव्र असू शकतो.

१९९७ मध्ये 'एल निनो'मुळे उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ, चक्रीवादळे आणि वणव्यांमुळे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाले होते. अमेरिकेच्या 'नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिस्ट्रेशन' ने अधिकृतपणे 'एल निनो'च्या अस्तित्वाला दुजोरा दिला आहे. एल निनो म्हणजे विषुववृत्ताजवळ प्रशांत महासागराचे पाणी गरम होणे, ज्यामुळे जगभरातील हवामान चक्रावर परिणाम होतो. 'नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिस्ट्रेशन' च्या घोषणेनुसार, या शरद ऋतूच्या उत्तरार्धात आणि हिवाळ्याच्या सुरुवातीला हा 'एल निनो' इतका तीव्र होण्याची ६३ टक्के शक्यता आहे की, '१९५० पासूनच्या ऐतिहासिक नोंदींनुसार तो आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या एल निनो घटनांपैकी एक ठरेल.'

# अशोक खरात प्रकरणात उज्ज्वल निकमांची एन्ट्री

## विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - अंधश्रद्धा आणि तंत्र-मंत्राच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता एक अत्यंत मोठी आणि महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणाच्या कायदेशीर लढाईत आता देशातील नामांकित कायदेतज्ज्ञ आणि ज्येष्ठ वकील ॲड.उज्ज्वल निकम यांची एन्ट्री झाली आहे.

या हाय-प्रोफाइल खटल्यात सरकारची बाजू मांडण्यासाठी राज्य शासनाने उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे. ॲड.निकम यांच्या एन्ट्रीमुळे या प्रकरणाशी संबंधित असलेल्या बड्या राजकीय नेत्यांचे आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. स्वतःला सिद्धपुरुष आणि अंकशास्त्रज्ञ म्हणवून घेणारा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण राज्यभरात चर्चेत आले आहे. दैवी शक्तीची भीती दाखवून, गुंगीचे औषध देऊन आणि प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या पेढा किंवा पाण्यातून अंमली पदार्थ देऊन तो महिलांचे लैंगिक शोषण करायचा.



# अयोध्येतील दानपेटीतील पैशांच्या अपहाराची बातमी धक्कादायक, प्रभू श्रीरामाचे ५ कोटी रुपये चोरणारे कोण आहेत : संजय राऊत

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** - येत्या काळात होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर शहरी भागात पक्षाची उपस्थिती मजबूत करण्याच्या गरजेवरही राष्ट्रवादीच्या अध्यक्षांनी भर दिला. शहरी भागातील मतदारसंघांची संख्या लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता असून, ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत पक्षाची ताकद वाढवण्यासाठी विशेष नियोजन आणि प्रभावी कार्यक्रम राबवण्याचे आवाहन त्यांनी केले.



पवार म्हणाल्या की, प्रत्येक कार्यकर्ता हा राष्ट्रवादी काँग्रेसचा 'ऑक्सिजन' आहे. त्यांनी नेते आणि कार्यकर्त्यांना 'माझा बूथ, माझे गाव' या संकल्पनेअंतर्गत बूथ पातळीवर काम करण्याचे आवाहन केले. नेते आणि पदाधिकाऱ्यांना इशारा देताना पवार म्हणाल्या की, पक्षाची प्रतिमा जपणे ही सर्वांची सामायिक जबाबदारी आहे. 'पक्षाची प्रतिमा डागाळण्यापासून रोखणे ही माझ्यासह सर्वांचीच जबाबदारी आहे. मला कोणतीही कठोर भूमिका घेणे भाग पडेल अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घ्यावी,' असे त्या म्हणाल्या.

कठोर निर्णय घेण्यास घाबरणार नाही पक्षासाठी कठीण निर्णय घेण्यास त्या कचरणार नाहीत. मी पक्षाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देईन. त्यात कोणताही अनावश्यक हस्तक्षेप झाल्यास त्याचा नक्कीच विचार केला जाईल,' असे त्या म्हणाल्या. संघटनेच्या हितासाठी कडक निर्णय घेताना आपण अजित पवारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवू, असेही त्यांनी नमूद केले.

विचारसरणीशी तडजोड नाही गेल्या २७ वर्षांतील पक्षाच्या प्रवासाची आठवण करून देताना त्या म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत राहिली आणि विरोधी पक्षातही बसली आहे. पण आपल्या विचारसरणीशी कधीही तडजोड केली नाही. 'पक्षाची राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून मी तुम्हाला पुन्हा एकदा शब्द देते की, भविष्यातही आम्ही तसे करणार नाही,' असे त्या म्हणाल्या. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले की, २००४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीत सर्वात मोठा घटक पक्ष म्हणून पुढे आल्यानंतर पक्षाने मुख्यमंत्रीपदावर दावा ठोकला असता, तर महाराष्ट्राचा राजकीय इतिहास वेगळा असता, असे त्यांनी सांगितले.

फुटीचे राजकारण सहन करणार नाही

# पक्षाच्या वर्धापन दिन सोहळ्यात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचा इशारा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** - राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुटीचे राजकारण अजिबात खपवून घेतले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पक्षाच्या अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरुवारी दिला. तसेच समाज आणि जातींमध्ये दरी निर्माण करू पाहणाऱ्या शक्तींना संघटनेत कोणतेही स्थान असणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

मुंबईत आयोजित राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पक्षाच्या हिताचे रक्षण करणे ही आपल्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट असल्याचे सांगत त्यांनी इशारा दिली की, जर कोणी पक्षाची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न केला, तर कठोर निर्णय घेण्यास आपण मागेपुढे पाहणार नाही.




त्या म्हणाल्या, 'राजकारणाच्या नावाखाली जाती-धर्मांमध्ये फूट पाडणाऱ्या प्रवृत्तींना राष्ट्रवादी काँग्रेस कधीही थारा देणार नाही. अल्पसंख्याक, मागासवर्गीय, ओबीसी, आदिवासी आणि समाजातील सर्व घटकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे पवार म्हणाल्या.

समाजातील सर्व घटकांनी सलोख्याने राहा-वे असे वातावरण निर्माण करण्यासाठी पक्ष सातत्याने प्रयत्नशील राहील, असे सांगून त्या म्हणाल्या की, या उद्दिष्टासाठी आवश्यक असल्यास राजकीय तडजोडीही स्वीकारल्या पाहिजेत.

येत्या काळात होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर शहरी भागात पक्षाची उपस्थिती मजबूत करण्याच्या गरजेवरही राष्ट्रवादीच्या अध्यक्षांनी भर दिला. शहरी भागातील मतदारसंघांची संख्या लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता असून, ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत पक्षाची ताकद वाढवण्यासाठी विशेष नियोजन आणि प्रभावी कार्यक्रम राबवण्याचे आवाहन त्यांनी केले.

# उरी सेक्टरमधील स्फोटात कराडचे जवान अर्जुन जाधव शहीद

## १५ जूनला सुट्टीवर येणार होते, २५ जूनला होता मुलाचा पहिला वाढदिवस

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**कराड** - जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ कर्तव्य बजावत असताना झालेल्या भीषण हँड ग्रेनेड स्फोटात कराड तालुक्यातील शहापूर गावचे सुपुत्र जवान अर्जुन राजेंद्र जाधव (३०) यांना वीरमरण आले. या दुर्दैवी घटनेमुळे शहापूर गावासह संपूर्ण कराड तालुक्यावर शोककळा पसरली आहे.



मंगळवारी सायंकाळी उरी येथील कमलकोट परिसरात गस्त घालत असताना हा स्फोट झाला. या दुर्घटनेत अर्जुन जाधव यांच्यासह ऐरोली (नवी मुंबई) येथील जवान विक्रम चव्हाण हे देखील शहीद झाले. अर्जुन जाधव हे भारतीय लष्कराच्या बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपचे जवान होते. गेल्या नऊ वर्षांपासून ते देशसेवेत कार्यरत होते. सध्या त्यांची नियुक्ती काश्मीरमधील ८ राष्ट्रीय रायफल्स (आरआर) युनिटमध्ये होती. स्फोटानंतर लष्कराच्या सहकाऱ्यांनी तातडीने बचावकार्य राबवून दोन्ही जवानांना श्रीनगर येथील बदामीबाग लष्करी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. स्फोट नेमका कशामुळे झाला, याचा तपास लष्कराकडून सुरू आहे. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद अर्जुन जाधव यांचे पार्थिव लष्करी इतमामात मुंबईत आणण्यात आले असून शुक्रवारी सकाळी ते त्यांच्या मूळ गावी शहापूर येथे दाखल होणार आहे. त्यानंतर संपूर्ण शासकीय आणि लष्करी इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

तहसीलदार कल्पना ढवळे यांनी शहापूर येथे जाऊन शहीद जवानाच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. अर्जुन जाधव यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, अकरा महिन्यांचा मुलगा, दोन बहिणी आणि भारतीय नौदलात कार्यरत असलेला धाकटा भाऊ असा परिवार आहे.

## मृत भारतीय खलाशांच्या कुटुंबीयांशी संपर्क नाही

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** - ओमानच्या किनारपट्टीजवळ अमेरिकेच्या लष्करी हल्ल्यात ऑइल टँकरवर (तेलवाहू जहाज) मृत पावलेल्या तीन भारतीय खलाशांच्या कुटुंबीयांशी अद्याप कोणताही संपर्क होऊ शकलेला नाही, अशी माहिती 'फॉर्वर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडिया' (एफएसयूआय) ने गुरुवारी दिली. आम्हाला या खलाशांबद्दल सविस्तर माहिती लवकरच मिळेल, असे संघटनेचे सरचिटणीस मनोज यादव यांनी सांगितले. कथित नियमांचे किंवा निर्देशांचे पालन न केल्यामुळे या जहाजाच्या इंजिन रूमवर अचूक मारा करणारी दारुगोळा डागण्यात आली.

# राज्य सरकारने शेतकऱ्याला दिलेला बैल आजारी निघाला

## नांगर ओढताना खाली बसला, उपचाराचा भुर्दंड शेतकऱ्याच्या माथी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**लातूर** - निसर्गाच्या अवकृपेने एका गरीब शेतमजूर कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे.

लातूरमधील देवणी तालुक्यातील बोंबळी गावातील काशिनाथ गायकवाड यांचा बैल वादळी पावसादरम्यान वीज पडून मृत्युमुखी पडला. ऐन पेरणीच्या हंगामात शेतीसाठीचा एकमेव आधार गमावल्याने कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आणि गायकवाड यांच्या पत्नीने पुढाकार घेत थेट जू आपल्या खांद्यावर घेतले आणि शेतीची कामे सुरू



ठेवण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मिडीयावरती व्हायरल झाल्यानंतर लातूरच्या शेतकऱ्याच्या मदतीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धावले.

स्थानिक गोशाळेतून शेतकऱ्याला बैल दिला असल्याची माहिती समोर आली आहे. पण सरकारच्या मदतीने मिळालेला तो बैल दोनच दिवसांत शेतातील मशागतीदरम्यान खाली बसला. पशुवैद्यकीय तपासणीत तो आजारी असल्याचे निष्पन्न झाले. परिणामी मदत मिळण्या ऐवजी शेतकऱ्यावर आता त्या बैलाच्या उपचाराचा खर्च करण्याची वेळ आली आहे अशी माहिती समोर आली आहे. रोहित पवारांनी सोशल मिडीयावरती पोस्ट करत याबाबतची माहिती शेअर केली आहे.

बैलावर उपचारासाठी स्वतःच्या खिशातील पैसे खर्चण्याची वेळ रोहित पवारांनी सोशल मिडीयावर पोस्ट करत म्हटलंय की, विरोधक आणि माध्यमांच्या दबावामुळं लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्याला नुकसानभरपाई म्हणून दिलेला बैल आजारी निघाला. आता त्याच्या उपचाराचाच खर्च संबंधित शेतकऱ्याला करावा लागतोय.

# 'सारथी'तर्फे गाविलगड आणि असदगड किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम : सिडबॉलद्वारे वृक्षारोपण उपक्रम

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**अमरावती** - मराठा, कुणबी व कुणबी-मराठा समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत असलेल्या 'सारथी' संस्थेच्या वतीने राज्यातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांवर विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नुकताच हा उपक्रम पार पडला. छत्रपती शिवरायांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असलेल्या गड-किल्ल्यांचे संवर्धन करणे आणि शाहू महाराजांच्या लोककल्याणाचा विचार पुढे नेणे, हा यामागचा मुख्य उद्देश होता.





या मोहिमेत अमरावती विभागांतर्गत चिखलदरा येथील गाविलगड आणि अकोला येथील असदगड किल्ल्यावर 'सारथी'च्या संशोधन अधिछात्रवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गाविलगड येथे उपव्यवस्थापकीय संचालक सचिन शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थी शंकर गोरे, रूपेश पडघन, सदाशिव आरसोड, योगेश भोयर, पवन मापारी आणि कर्मचारी किरण चाफाले, देवानंद सोळंके व कुलदीप सूरकर यांनी परिसर स्वच्छ केला.

या स्वच्छता मोहिमेसोबतच विद्यार्थ्यांनी स्थानिक प्रजातींच्या बिया, माती, शेण व बाविस्टीन पावडरचा वापर करून शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केलेले 'सिडबॉल' चिखलदरा परिसरात टाकले, जेणेकरून पावसाळ्यात उत्तम वृक्षनिर्मिती होईल.

तसेच, अकोला येथील असदगड किल्ल्यावर अक्षय बांगर, अनिरुद्ध दळवी, अमोल धोत्रे, अजय काळे, सूरज पारस्कर आणि प्रिया शेटे या संशोधक विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबवले. या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीतील गड-किल्ल्यांचे योगदान अधोरेखित करण्यात आले असून, नागरिकांनी या वास्तूंचे पावित्र्य राखावे व स्वच्छता ठेवावी, असे आवाहन 'सारथी' संस्थेने केले आहे.

# मान्सूनपूर्व पूर आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## मालखेड तलावावर रंगीत तालीम संपन्न

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**अमरावती** - आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उद्भवू शकणाऱ्या पूर परिस्थितीचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिष येरेकर यांच्या



आदेशाने मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथक, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने या थरारक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, चांदूर रेल्वेचे नायब तहसीलदार अनिल चौरे, पोलीस निरीक्षक मिश्रा, पोलीस निरीक्षक यादव, एनडीआरएफ नागपूरचे डॉ.झा, मुंबई मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ अनुराग कचोरी, महसूल अधिकारी प्रमोद शिरसाठ, तलाठी दीपक चव्हाण, आरोग्य यंत्रणेचे डॉ.अविनाश पवार, प्रीती पवार, सौरव पाठक, मनोज माकोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सचिन धरमकर, विशाल लिमकर, आकाश निमकर, कौस्तुभ वैद्य, सुमित बांबल, प्रतिक कडू, नारायण दवंगे, अशोक निंबरते तसेच 'आपला मित्र' संस्थेचे तुषार गोंडाणे व अमोल गोंडाणे यांनी प्रत्यक्ष पाण्यात उतरून शौर्यपूर्ण बचावकार्याची प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी केले.

# संपादकीय

चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.

## मंत्रालयातील वाढते विभाग आणि जनसामान्यांचे वास्तव

‘कालाय तस्मै नमः’ अर्थात काळाला नमस्कार असो. काळ बदलतो, तशी परिस्थिती बदलते आणि त्यासोबतच सत्तेची समीकरणेही बदलतात. सध्या महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय वतुर्ळात एक मोठी चर्चा सुरू आहे, ती म्हणजे मंत्रालयातील सरकारी विभागांच्या वाढत्या संख्येची. मंत्रालयात सध्या अस्तित्वात असलेल्या ३३ विभागांची संख्या लवकरच ४५ होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. एकेकाळी २० ते २५ विभागांवर चालणारा राज्याचा गाडा आज ३३ वर पोहोचला आहे आणि लवकरच तो पावणेपन्नासच्या घरात जाईल. पण या प्रशासकीय विस्ताराने सर्वसामान्यांचे प्रश्न खरोखरच सुटणार आहेत का, की हा केवळ राजकीय सोयीचा आणि सत्तेच्या सारीपाटावरील एक खेळ आहे, यावर आज सखोल आत्मपरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे. सत्तेचा मूळ हेतू आणि प्रशासकीय फुगवटा सत्ता नेमकी कोणासाठी आणि कशासाठी वापरायची असते, याचे उत्तर लोकशाहीच्या मूळ व्याख्येत दडलेले आहे. सत्ता ही जनतेच्या कल्याणासाठी, त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्यासाठी असते. जर सत्तेचा हा मूळ हेतू स्पष्ट असेल, राज्यकर्त्यांची नियत साफ असेल आणि प्रशासनात संवेदनशीलता असेल, तर देशात किंवा राज्यात रोज नवे कायदे आणि नियम करण्याचीसुद्धा गरज भासणार नाही. जुन्याच नियमांची आणि कायद्यांची प्रामाणिक अंमलबजावणी करून जनतेला सुशासन देता येणे शक्य आहे. परंतु, आजचे वास्तव वेगळे आहे. विभागांची संख्या वाढवणे म्हणजे कामाचे विकेंद्रीकरण करणे आणि कार्यक्षमता वाढवणे असे कागदावर सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात हा केवळ 'प्रशासकीय फुगवटा' ठरत आहे. पूर्वी जेव्हा मंत्रालयात २०-२५ विभाग होते, तेव्हा लोक शासनव्यवस्थेबाबत पूर्णपणे समाधानी होते असे नाही; आणि आज ३३ विभाग असतानाही जनता खूप सुखी आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही. मग विभागांची संख्या वाढवून नक्की साध्य काय होणार? हा प्रश्न आज प्रत्येक सुजाण नागरिकाला पडला आहे. मंत्रालयातील जाळ्या: व्यवस्थेच्या अपयशाचे जिवंत प्रतीक विभागांच्या संख्येतील वाढ आणि जनतेचे समाधान यांचा थेट संबंध जोडायचा झाल्यास मंत्रालयाच्या इमारतीकडे पाहणे पुरेसे ठरेल. आज मंत्रालयाच्या वरच्या मजल्यांवरून नैराश्यातून किंवा संतापातून कोणी आत्महत्येचा प्रयत्न करू नये, कोणी खाली उड्या घेऊ नयेत, म्हणून सुरक्षा जाळ्या लावण्यात आल्या आहेत. ज्या इमारतीला राज्याचे 'शक्तीपीठ' किंवा 'न्यायाचे मंदिर' म्हटले जाते, तिथेच जनतेला रोखण्यासाठी आणि त्यांच्या उड्या वाचवण्यासाठी जाळ्या लावाव्या लागतात, यासारखे दुसरे दुर्दैव नाही.

# १२ वर्षांच्या प्रचारकाळात हरवलेला भारत

मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचा मोठा उत्सव साजरा केला जात आहे. जाहिरातींमधून यशाची अनेक उदाहरणे दिली जात आहेत. परंतु इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही. इतिहास कारखाने मोजतो, संस्था मोजतो, रोजगार मोजतो, लोकशाहीची ताकद मोजतो आणि सामान्य माणसाच्या जीवनातील बदल मोजतो.

नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची बारा वर्षे पूर्ण केली आहेत. सरकारी जाहिराती, विशेष मोहिमा, सोशल मीडियावरील प्रचार आणि भाजप व मित्रपक्षाच्या नेत्यांची भाषणे यामधून या बारा वर्षांच्या संख्यात्मक कारकीर्दीचे गौरवगान केले जात आहे. मोदी हे जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहिलेले नेते ठरले आहेत, हा या प्रचाराचा केंद्रबिंदू आहे. ते सत्य नाही. जवाहरलाल नेहरू हे या देशाचे सर्वाधिक काळ पंतप्रधान राहिलेले आहेत हे ऐतिहासिक सत्य आहे. भाजपच्या दाव्यावर विश्वास ठेवला तर मग सरदार वल्लभभाई पटेल देशाचे गृहमंत्री कोणत्या काळात होते? डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.शामाप्रसाद मुखर्जी कोणत्या काळात केंद्रीय मंत्री होते? काही क्षणापुरता भाजपच्या खोट्या प्रचारावर विश्वास ठेवला तरी इतिहास केवळ सत्तेचा कालावधी मोजत नाही; तो त्या सत्तेने राष्ट्राला काय दिले याचे मूल्यमापन करतो. लोकशाहीत एखादा नेता किती काळ सत्तेत राहिला यापेक्षा त्या काळात त्याने कोणती संस्थात्मक पायाभरणी केली, अर्थव्यवस्थेला कोणती दिशा दिली, समाजात कोणते परिवर्तन घडवून आणले आणि पुढील पिढ्यांसाठी कोणता वारसा निर्माण केला, याला अधिक महत्त्व असते. म्हणूनच नरेंद्र मोदी यांच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करताना प्रचाराच्या झगमगाटापेक्षा वास्तवाच्या आरशात पाहण्याची गरज आहे.

घोषणांचे राजकारण आणि वास्तवातील तफावत २०१४ मध्ये नरेंद्र मोदी सत्तेवर आले तेव्हा देशात मोठ्या अपेक्षांचे वातावरण होते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास, शेतकरी, महिला सक्षमीकरण आणि जागतिक पातळीवर भारताचे नेतृत्व अशा अनेक आश्वासनांनी जनतेला आकर्षित केले. नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासून देशासमोर अनेक महत्त्वाकांक्षी आश्वासने ठेवली. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये, दरवर्षी २ कोटी रोजगार, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, काळा पैसा परत आणणे, स्मार्ट सिटींची उभारणी, मेक इन इंडियाद्वारे उत्पादन क्षेत्रात क्रांती, गंगा शुद्धीकरण अशा अनेक घोषणांचा मोठा गाजावाजा केला. मात्र बारा वर्षांनंतर या आश्वासनांचे मूल्यमापन करताना यातील बहुतांश घोषणा हवेतच विरल्याचे चित्र आहे.




मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्कील इंडिया, स्टार्टअप इंडिया, स्मार्ट सिटी, सांसद आदर्श ग्राम योजना, आत्मनिर्भर भारत अशा योजनांचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात आला. प्रत्येक योजनेसोबत भारताच्या भविष्यातील भव्य चित्र रंगवण्यात आले. परंतु आजही वाढती बेरोजगारी, कृषी क्षेत्रातील संकटे, बकाल शहरे, वाढती आर्थिक विषमता आणि महागाई यांसारख्या प्रश्नांनी सामान्यांचे जगणे कठिण झाले आहे.

नोटाबंदी : आर्थिक धक्क्याचे राजकारण ८ नोव्हेंबर २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणातून नोटाबंदीची घोषणा केली. हा निर्णय स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात मोठ्या आर्थिक निर्णयांपैकी एक मानला गेला. काळा पैसा संपुष्टात येईल, दहशतवादाला आर्थिक पुरवठा थांबेल आणि बनावट चलनाचे जाळे उद्ध्वस्त होईल, असे दावे करण्यात आले. देशभरातील कोट्यवधी नागरिक बँकांच्या रांगांमध्ये उभे राहिले, रांगेत अनेकांचा मृत्यू झाला. ग्रामीण अर्थव्यवस्था, लघुउद्योग, व्यापारी, शेतकरी आणि असंघटित क्षेत्रातील कामगार उद्ध्वस्त झाले. आज मागे वळून पाहिले तर नरेंद्र मोदींनी नोटाबंदीच्या सांगितलेल्या उद्दिष्टांमधील एकही पूर्ण झाले नाही. उलट लाखो लघु व मध्यम उद्योग बंद झाले, कोट्यवधी लोक बेरोजगार झाले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची मोठी हानी झाली.

रोजगाराचे आश्वासन आणि युवकांची निराशा मोदी सरकारने दरवर्षी २ कोटी रोजगार निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. पण त्यांच्या सत्ताकाळात देश ४७ वर्षांतील बेरोजगारीचा उच्चांक अनुभवतो आहे. आज लाखो तरुण सरकारी भरतीची वाट पाहत आहेत. परीक्षा रद्द होत आहेत, मूल्यांकनाचा घोळ सुरू आहे. भारत हा तरुणांचा देश आहे, पण सरकारच्या गलथानपणामुळे तरुण हताश आणि निराश आहेत.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन मोदी सरकारने दिले होते. कृषी क्षेत्रात अनेक योजना जाहीर करण्यात आल्या. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढता उत्पादन खर्च आणि हमीभावाचा प्रश्न कायम आहे. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये शेतकरी अजूनही कर्जबाजारीपणामुळे मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत.

वाढती आर्थिक विषमता भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था झाल्याचा दावा सरकार सातत्याने करत आहे. परंतु अर्थव्यवस्थेचा वाढीचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलाच नाही. काही मोजक्या उद्योगपतींची संपत्ती झपाट्याने वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला महागाई, बेरोजगारी आणि उत्पन्नातील असमानतेमुळे सामान्य नागरिक जीवन जगण्यासाठी संघर्ष करत आहेत. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींनी मध्यमवर्ग आणि गरीब पिचला जात आहे. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी तो सातत्याने कर्ज काढत आहे. दुर्दैवाने देशात तसे चित्र सध्या तरी दिसत नाही.

नेहरूंनी उभारल्या संस्था, मोदींनी उभारली प्रतिमा? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्षांच्या सत्ताकाळातील बहुतांश वेळ नेहरूंवर टीका करण्यात गेला. नेहरूंनी त्यांच्या सत्ताकाळात एम्स, आयआयटी, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, राष्ट्रीय संशोधन संस्था, मोठी धरणे, वैज्ञानिक संशोधनाची पायाभरणी केली. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिक शिक्षणव्यवस्थेचा विस्तार ही नेहरूंच्या दूरदृष्टीची उदाहरणे आहेत. त्यांनी राष्ट्रनिर्मितीचा पाया संस्थांवर उभारला. मोदी सरकारच्या काळात मोठ्या प्रमाणावर व्यक्तिकेंद्री राजकारणाचा प्रभाव वाढला. राष्ट्रनिर्मिती ही व्यक्तिपूजेवर नव्हे तर संस्थांच्या बळकटीकरणावर अवलंबून असते.

लोकशाही संस्थांवरील वाढते प्रश्नभारतीय लोकशाहीची ताकद तिच्या स्वायत्त संस्थांमध्ये आहे. संसद, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, प्रसारमाध्यमे आणि विविध घटनात्मक संस्था या लोकशाहीच्या आधारस्तंभ आहेत. गेल्या काही वर्षांत या संस्थांच्या स्वायत्ततेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. केंद्रीय तपास यंत्रणांच्या गैरवापराची शेकडो नव्हे हजारो उदाहरणे समोर आली. लोकशाहीमध्ये सरकारला प्रश्न विचारणे हे देशविरोधी नसते. उलट सत्तेची जबाबदारी निश्चित करण्यासाठी ते आवश्यक असते. पण आजच्या वातावरणात टीकाकारांना देशद्रोही, खलिस्तानी म्हटले जाते.

नेहरू आणि मोदी : तुलना कोणत्या निकषावर? नेहरूंनी विभाजनाच्या जखमा, दारिद्र्य, निरक्षरता आणि संस्थात्मक शून्यतेतून भारत उभा केला. त्यांनी विज्ञाननिष्ठ भारताचे स्वप्न पाहिले. लोकशाही संस्था मजबूत केल्या. अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाद्वारे भारताला स्वतंत्र जागतिक ओळख मिळवून दिली. मोदी यांना स्थिर लोकशाही, मजबूत संस्था आणि वाढती अर्थव्यवस्था यांचा वारसा मिळाला होता. पण मोदींच्या कार्यकाळात हा मजबूत पायाही कमकुवत झाला.

इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचा मोठा उत्सव साजरा केला जात आहे. जाहिरातींमधून यशाची अनेक उदाहरणे दिली जात आहेत. परंतु इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही. इतिहास कारखाने मोजतो, संस्था मोजतो, रोजगार मोजतो, लोकशाहीची ताकद मोजतो आणि सामान्य माणसाच्या जीवनातील बदल मोजतो. त्या कसोटीवर प्रत्येक सत्ताधाऱ्याला उभे राहावे लागते.

# विधान परिषद निवडणुकीत महायुतीसमोर आव्हाने



नाशिक विधान परिषद निवडणूक सध्या राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे. महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार नरेंद्र दराडे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी जोरदार दंड थोपटल्याने ही निवडणूक अधिकच चुरशीची बनली आहे.

विशेष म्हणजे गोकुळ गीते हे भाजपचे इच्छुक उमेदवार गणेश गीते यांचे बंधू असल्याने महायुतीसमोर अंतर्गत मतभेद आणि राजकीय समीकरणांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे विधान परिषद मतदारसंघाची निवडणूक तब्बल तीन वर्षांनंतर होत आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे राज्यातील राजकीय वतुर्ळाचे विशेष लक्ष लागले आहे. महायुतीचे उमेदवार माजी आमदार नरेंद्र दराडे यांच्याविरोधात पिंपळगाव बाजार समितीचे संचालक गोकुळ गीते यांनी चांगलेच आव्हान उभे केले आहे. मावळते आमदार नरेंद्र दराडे यांना शिवसेनेकडून पुन्हा एकदा उमेदवारी मिळवण्यात यश आले आहे. नाशिक जिल्ह्यात भाजपचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ मोठे असल्याने भाजपनेही या जागेवर दावा केला होता. मात्र महायुतीतील जागावाटपात ही जागा शिवसेनेकडेच कायम राहिली आणि नरेंद्र दराडे यांना पुन्हा संधी देण्यात आली. दरम्यान, भाजपकडून गणेश गीते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार त्यांनी आपला अर्ज मागे घेतला. त्यानंतर त्यांचे बंधू गोकुळ गीते हे कोणत्याही राजकीय पक्षाशी थेट संबंधित नसल्याने त्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे या निवडणुकीत अनपेक्षित रंग भरले गेले आहेत.

गोकुळ गीते यांची उमेदवारी मागे घेण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी अनेक प्रयत्न केल्याची चर्चा आहे. पालकमंत्री गिरीश महाजन, मंत्री उदय सामंत आणि मंत्री दादा भुसे यांनी गीते यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. मात्र या चर्चेतून कोणताही सकारात्मक तोडगा न निघाल्याने गोकुळ गीते यांनी आपली उमेदवारी कायम ठेवत निवडणूक लढविण्याचा निर्णय निश्चित केला आहे. याच दरम्यान, दराडे यांचे नातेवाईक कुणाल दराडे यांनी गोकुळ गीते यांच्याविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यामुळे राजकीय वातावरण अधिक तापले आहे. या घटनेनंतर गोकुळ गीते आणि त्यांच्या समर्थकांनी कोणत्याही परिस्थितीत माघार न घेण्याचा निर्धार केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ही निवडणूक आता प्रतिष्ठेची बनली आहे. राजकीय समीकरणांचा विचार करता नरेंद्र दराडे यांच्यासमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. येवला मतदारसंघातील राजकीय प्रतिस्पर्धी छगन भुजबळ यांचा विरोध, राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नाराज घटकांची भूमिका तसेच गणेश गीते यांचे भाजप आणि शिवसेनेतील अनेक नगरसेवक व पदाधिकाऱ्यांशी असलेले जवळचे संबंध यामुळे गोकुळ गीते यांचे पारडे काहीसे जड असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. तथापि, राजकारणात शेवटच्या क्षणापर्यंतचे अंदाज नेहमीच खरे ठरतील असे नाही. अनेक निवडणुकांमध्ये अंतिम टप्प्यात समीकरणे बदलल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे महायुतीचे नेते पुढील काळात कोणती रणनीती आखतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेनेची ही जागा कायम राखण्यासाठी मंत्री उदय सामंत, मंत्री दादा भुसे, आमदार सुहास कांदे तसेच महायुतीचे इतर नेते आणि पदाधिकारी कसोशीने प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना फटका बसल्यास त्याला भारतीय जनता पक्ष आणि मंत्री गिरीश महाजन जबाबदार असतील, असा अप्रत्यक्ष टोला मंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकारांशी बोलताना लगावला होता.

## आजचे राशिभविष्य

गुरुवार, २३ ऑक्टोबर २०२५

मार्गशीर्ष मास, कृष्ण पक्ष

तिथि २२ | नक्षत्र

**मेष :** नोकरीमध्ये नवीन बदलांचे संकेत आहेत. प्रवासाचे योग आहेत. संयम व हुशारीने निर्णय घ्या.

**वृषभ :** घरातील प्रश्न सुटतील. आरोग्याची काळजी घ्या, विशेषतः आहारावर लक्ष द्या.

**मिथुन :** कौशल्यपूर्ण कामात यश मिळेल. प्रवासाची योजना आखल्यास चांगला अनुभव मिळेल.

**कर्क :** भावनिक निर्णयांमुळे फायदा होईल. घरातील ज्येष्ठांशी संवाद साधणे फायद्याचे ठरेल.

**सिंह :** नेतृत्वगुणांना वाव मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमचे कौतुक होईल, नवीन प्रकल्प मिळतील.

**कन्या :** नियोजित नियोजित कामांमध्ये अडथळे येतील. संगमाने कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

**तुळा :** व्यापारात मोठा आर्थिक लाभ होण्याची शक्यता. कौटुंबिक सौख्य मिळेल. आरोग्याची काळजी घ्या.

**धनु :** अभ्यासात यश मिळेल. प्रवासाचे योग आहेत, नवीन अनुभव मिळतील.

**मकर :** कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील, वरिष्ठांकडून मार्गदर्शन मिळेल, कामात यश येईल.

**कुंभ :** नवीन कल्पना सुचतील. सामाजिक कामात आवड वाढेल, समाधानी वाटेल.

**मीन :** कलात्मक विषयात यश मिळेल. मित्रपरिवारान वाठ होईल, नवीन मित्र मिळतील.

© सर्व हक्क राखीव. आपल्या कुंडलीनसार हे वैयक्तिक भाकीत वेगळे अस शकते. तज्ञांचा सल्ला घ्या.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# गिरीश महाजन म्हणाले, नाशिकपाठोपाठ जळगावचा तिढाही सुटला : पण बंडखोर उमेदवार रेश्मा काळेंच्या 'त्या' कृतीने भुवया उंचावल्या!

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

नाशिकमधील महायुतीतील बंडखोरीचा तिढा सोडवण्यात संकटमोचक मानले जाणारे मंत्री गिरीश महाजन यांना यश आले असले, तरी जळगावमधील बंडखोरीचा पेच अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. नाशिकपाठोपाठ जळगावचाही तिढा सुटला असून केवळ औपचारिक घोषणा बाकी असल्याचे विधान मंत्री गिरीश महाजन यांनी केले होते. मात्र, त्यानंतर शिवसेनेच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे अचानक 'नॉट रिचेबल' झाल्याने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.

विधान परिषद निवडणुकीसाठी अर्ज भरल्यानंतर शिवसेनेच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांनी नाशिकमधील बंडखोरीवर आपले पत्ते ठेवले होते. नाशिकमधील बंडखोराने माघार घेतली, तर आपणही जळगावमधून माघार घेऊ, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी सुरुवातीला मांडली होती. नाशिकमधील गुंतागुंतीमुळेच आपल्याला जळगावातून उमेदवारी अर्ज भरावा लागल्याचेही त्यांनी जाहीर केले होते. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

नाशिकमधील महायुतीतील बंडखोरीचा तिढा सोडवण्यात संकटमोचक मानले जाणारे मंत्री गिरीश महाजन यांना यश आले असले, तरी जळगावमधील बंडखोरीचा पेच अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. नाशिकपाठोपाठ जळगावचाही तिढा सुटला असून केवळ औपचारिक घोषणा बाकी असल्याचे विधान मंत्री गिरीश महाजन यांनी केले होते.

मात्र, त्यानंतर शिवसेनेच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे अचानक 'नॉट रिचेबल' झाल्याने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.

---

# योग दिन महोत्सवात भाग घेण्यासाठी आदेश काढाव

## पतंजलि योग समितिचे जिल्हा प्रभारी गिरिधर देशमुख यांची मागणी

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने अमरावती जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पतंजलि योग समितिला प्रत्येक तहसिल कार्यालय, पंचायत समिति व नगरपरिषदेने सहकार्य करावे, तहसिल कार्यालय व नगर परिषद, पंचायत समिती, शाळा, महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी योग दिन महोत्सवात भाग घेण्यासाठी आदेश काढावे, अशी सुचना पतंजलि योग समितिचे जिल्हा प्रभारी गिरिधर देशमुख यांनी केली आहे.

दरवर्षीच जिल्हा क्रिडा अधिकारी व शिक्षणाधिकारी अमरावती शहरापुरतेच आंतरराष्ट्रीय योग दिनाचे कार्यक्रम घेतात पण आत्ता १४ तालुक्यात हि अमरावती शहरासारखे शासकिय योग दिनाचे कार्यक्रम घेऊन पंतजलि योग समितिच्या तालुका समितिला विचारात घेऊन सहकार्य करावे किंबहुना जिल्हाधिकारी महोदयांनी सर्व तहसिलदार, न.प.मुख्याधिकारी व पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना आदेश देऊन १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करावा, अशी सुचना जिल्हा प्रभारी गिरिधर देशमुख यांनी केली आहे ते वरुड नगर परिषदेच्या सास्कृतिक भवनामध्ये बोलत होते.

भारत स्वाभिमान, महिला पतंजलि योग समिति, युवाभारत, किसान पंचायतच्या माध्यमाने अनेक वर्षापासुन निशुल्क योग चळवळ अमरावती जिल्ह्यात राबविली जात आहे. १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन महोत्सवात जिल्ह्यातील सर्व आमदारांनी सहयोग द्यावा अशी सुचना ही देशमुख यांनी केली आहे.

---

## नागपूर सायन्स कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे

# ऑनलाईन इको-रील स्पर्धेसह ऑनलाईन पर्यावरण प्रश्नमंजुषा

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




***नागपूर*** – जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी, अमरावती संचालित सायन्स कॉलेज नागपूर येथील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे ईको रील एआय चॅलेंज २०२६ या आंतरमहाविद्यालयीन व आंतरविद्यापीठीय ऑनलाईन इको-रील स्पर्धेसह ऑनलाईन पर्यावरण प्रश्नमंजुषाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला देशातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख यांना औषधी वनस्पतीचे रोप भेट देऊन पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालये व विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी गुगल फॉर्मद्वारे इको-रील अपलोड करुन सहभाग नोंदविला.

प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण, वन्यजीव आणि मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच त्यावरील उपाययोजना अत्यंत प्रभावी पद्धतीने या व्हिडिओमध्ये मांडण्यात आल्या होत्या. उपक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख यांनी ऑनलाइन बैठकीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून युवकांनी तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक व पर्यावरणीय परिवर्तनासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक डॉ.शरयू देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नोंदणी प्रक्रिया, ऑनलाइन समन्वय, व्हिडिओ संकलन तसेच संपूर्ण नियोजनामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

विभागप्रमुख डॉ. आर.एच.महाखोडे यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीवा अधिक दृढ होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात डॉ.ए.एम.बुद्धे व डॉ.आर.पी.सोनवलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

त्यांच्या मार्गदर्शन आणि समन्वयामुळे हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.

स्पर्धेतील सर्व इको-रील्सचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांमार्फत करण्यात येणार असून १२ जून २०२६ रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, आकर्षक पारितोषिके तसेच विशेष गौरव प्रदान करण्यात येणार आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम पर्यावरण संवर्धन, तंत्रज्ञानाचा विधायक वापर आणि युवकांच्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट संगम ठरला असून विद्यार्थ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद या उपक्रमाच्या यशाची साक्ष देणारा ठरला आहे.

---

# उकाडा, आर्द्रतेमुळे ठाणेकर हैराण : घामोळ्यांच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***ठाणे*** – ठाणे शहराचे यंदाचे कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिक उष्णतेने हैराण झाले आहेत. त्यातच अधूनमधून पडणारा पाऊस, वाढलेली आर्द्रता आणि कायम असलेला उकाडा यामुळे घामोळ्यांच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वच ठाणेकरांना घामोळ्यांचा असह्य त्रास सहन करावा लागत आहे.


गेल्या काही दिवसांपासून ठाण्यात पावसाच्या एक-दोन सरी कोसळत असल्या तरी वातावरणातील उकाडा कमी झालेला नाही. उलट पाऊस पडल्यानंतर हवेत आर्द्रतेचे प्रमाण वाढत असल्याने नागरिकांना अधिक घाम येत आहे. सध्या मान, पाठ, छाती, काखा आणि हातांवर लालसर पुरळ, खाज, जळजळ तसेच त्वचेची आग होणे अशा तक्रारी वाढल्या आहेत.

---

# निर्माते भारतीराजा यांचे चेन्नईत निधन

## 'रेड रोज'सह ४० हून अधिक चित्रपटांची निर्मिती : ६ राष्ट्रीय पुरस्कार विजेते

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**चेन्नई :** – ज्येष्ठ तमिळ दिग्दर्शक भारतीराजा यांचे ८४ व्या वर्षी बुधवारी चेन्नई येथे निधन झाले. वृध्दापकाळाने उद्धवलेल्या विविध आरोग्य समस्यांमुळे त्यांचे निधन झाले. भारतीराजा यांना सहा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, चार साऊथ फिल्मफेअर पुरस्कार, सहा तमिळनाडू राज्य चित्रपट पुरस्कार आणि एक नंदी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानाबद्दल भारत सरकारने २००४ साली त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते. भारतीराजा यांनी त्यांच्या कारकिर्दीत 'सोलवा सावन', 'रेड रोज' आणि 'सवेरेवाली गाडी' यांसारख्या काही हिंदी चित्रपटांचेही दिग्दर्शन केले आहे.

भारतीराजा यांनी १९७७ मध्ये '१६ वयाथिनिले' या चित्रपटातून दिग्दर्शक म्हणून पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी चार दशकांहून अधिक काळ चाललेल्या कारकिर्दीत ४० हून अधिक चित्रपटांचे दिग्दर्शन केले. तमिळ चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना 'इयक्कुनर इमयम' ही पदवी देखील मिळाली. 'रेड रोज' या चित्रपटात राजेश खन्ना आणि पूनम ढिल्लों यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. दिग्दर्शक म्हणून त्यांचा शेवटचा प्रदर्शित झालेला चित्रपट 'मींडम ओरु मारियाथाई' होता, जो २०२० साली प्रदर्शित झाला होता.

---

# सर्वात दुःखदायक प्रसंग : अहमदाबाद विमान अपघात, गुजरातचे पोलीस महासंचालक ज्ञानेंद्र सिंह यांचे प्रतिपादन

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***अहमदाबाद*** – येथे 'एआय-१७१' या एअर इंडियाच्या विमानाला १२ जून २०२५ रोजी झालेला अपघात हा आपल्या आयुष्यातील सर्वात दु:खदायक प्रसंग आहे, असे गुजरातचे पोलीस महासंचालक ज्ञानेंद्र सिंह मलिक यांनी सांगितले. एअर इंडियाच्या विमान अपघाताच्या वर्षपूर्तीनिमित्त ते म्हणाले की, ही दुर्घटना त्यांच्या स्मरणात केवळ त्याच्या भीषणतेमुळेच नाही, तर ढिगाऱ्यातून बाहेर काढलेल्या होरपळलेल्या मृतदेहांच्या विदारक दृश्यांमुळे कायमची कोरली गेली आहे. अपघातानंतर समन्वयाची प्रक्रिया अत्यंत सुरळीत पार पडली आणि यात सामील असलेल्या प्रत्येकाचे समन्वय आणि सहकार्य उत्कृष्ट होते. तरीही, माझ्या संपूर्ण कारकीर्दीतील ही सर्वात वेदनादायक घटना आहे.

दु:खाच्या वातावरणातही मलिक यांनी आपत्कालीन यंत्रणेने दाखवलेल्या विलक्षण वेग आणि अचूकतेचे कौतुक केले. अपघातानंतर राबवण्यात आलेली डीएनए मॅचिंग प्रणाली ही कदाचित जगभरात राबवलेल्या सर्वात जलद ओळख पटवण्याच्या मोहिमांपैकी एक ठरली, असे मलिक यांनी सांगितले.

---

## स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्टस येथील

# कोमल श्रीराव हिची 'ग्रॅज्युएट ट्रेनी' पदासाठी निवड

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्टस येथील बीसीए विभागाची विद्यार्थिनी कोमल संजय श्रीराव हिची टाटा कन्सल्टन्सी सर्विस मध्ये ग्रॅज्युएट ट्रेनी या पदासाठी निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कोमल श्रीराव हिच्या निवडीबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्राची ठाकरे यांनी तिचा स्वामी विवेकानंद यांची प्रतिमा देऊन सत्कार करत अभिनंदन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न, कौशल्य विकास आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून करिअरमध्ये प्रगती साधावी, असे मार्गदर्शन केले. या प्रसंगी बीसीए विभागप्रमुख प्रा. अनुप बेले, बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.अमरदीप खाडे तसेच प्रा.संजीवनी बारस्कर, प्रा.आलिया खान, प्रा.साक्षी राठी, प्रा.चेतन ढोले, प्रा.अनुजा मडघे, प्रा.सौरभ आकोटकर व इतर प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

सर्व प्राध्यापकांनी कोमलचे अभिनंदन करुन तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कोमलने आपल्या यशाचे श्रेय प्राध्यापक वर्गांना देत कॉलेज अंतर्गत शिक्षणासोबतच इतर स्किल डेव्हलोपमेंट उपक्रम अत्यंत महत्वाचे ठरलेत अशा शब्दात कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे हे यशस्वी फलित असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

---

# गुटखा तस्करीप्रकरणी पोलीस कर्मचारी पंकज दवडे निलंबित

## अवैध वाहतूक करताना रंगेहात पकडल्याने आयुक्तांची कठोर कारवाई

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेला पोलीस कर्मचारी पंकज दवंडे याला गुटख्याची अवैध वाहतूक करताना शेंदूरजनाघाट पोलिसांनी रंगेहात पकडल्यानंतर त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी बुधवारी (दि.१०) ही कारवाई केली.

मिळालेल्या माहितीनुसार, शहर पोलीस आयुक्तालयातील आरसीपी फोर्समध्ये कार्यरत असलेला पंकज दवंडे हा स्वतःच्या स्विफ्ट डिझायर कारमधून गुटख्याची अवैध वाहतूक करीत होता. शेंदूरजनाघाट पोलिसांनी ७ जूनच्या मध्यरात्री सापळा रचून त्याला पकडले. यावेळी त्याच्या ताब्यातून २ लाख ४७ हजार ८० रुपयांचा गुटखा तसेच स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करुन दवंडेला अटक केली होती. मंगळवारी न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली असून तो सध्या कारागृहात आहे. तपासादरम्यान पंकज दवंडे हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गुटख्याची अवैध वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर शेंदूरजनाघाट पोलिसांनी सविस्तर अहवाल शहर पोलीस आयुक्तांकडे पाठविला. अहवालाच्या आधारे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी त्याच्यावर निलंबनाची कारवाई करत विभागीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

या संदर्भात पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी सांगितले की, शेंदूरजनाघाट पोलिसांचा अहवाल प्राप्त होताच पोलीस कर्मचारी पंकज दवंडे याला निलंबित करण्यात आले असून प्रकरणाची पुढील चौकशी सुरु आहे. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली असुन कायद्याचे रक्षण करणाऱ्यांकडूनच कायद्याचे उल्लंघन झाल्याने नागरिकांमध्येही विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

# ९७९ बीएलओ गैरहजर : थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे निवडणूक अधिकाऱ्यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, मतदारयाद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई क्षेत्रात कार्यवाही सुरू आहे. या कामासाठी १० हजार १११ हून अधिक




बीएलओंची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र मतदान केंद्रस्तरीय अधिकारी वारंवार सूचना देऊनही अद्याप रूजू झाले नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे, रूजू न झालेल्या ९७९ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांवर (बीएलओ) संबंधित कार्यक्षेत्रातील पोलीस स्थानकांत गुन्हा दाखल करावा, असे निर्देश सर्व अतिरिक्त महापालिका आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी दिले आहेत. तसेच १३ आणि १४ जून रोजी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे प्रशिक्षण आयोजित करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

# काँग्रेस नेत्यांकडून आरोपांच्या फैरी, मात्र हर्षजीत देशमुख निवडणूक लढवण्यावर ठाम

**अमरावतीच्या राजकारणात मोठा ट्विस्ट, वंचित उमेदवाराला पाठिंबा देणार?**



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – अमरावती विधान परिषद निवडणूक दरम्यान मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहे.

अशातच काँग्रेसकडून वंचित उमेदवार निलेश विश्वकर्मा यांना पाठिंबा देण्यासंदर्भात बैठकींचे सत्र सुरूच असल्याची माहिती समोर आली आहे. काल (११ जून) रात्री पाठिंबा संदर्भात दोन बैठका पार पडल्यात. यावेळी सुरुवातीला काँग्रेसच्या नेत्यांची अंतर्गत बैठक संपन्न झाली. त्यानंतर वंचितच्या उमेदवारासोबत एक गुप्त बैठक झाल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, वंचित उमेदवाराला पाठिंबा देण्यासंदर्भात आज दुपारपर्यंत निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, काल (११ जून) झालेल्या बैठकीचा तपशील अमरावतीतील काँग्रेस नेते काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना कळवतील. त्यानंतर प्रदेश काँग्रेस पाठिंबा संदर्भात निर्णय घेईल, अशी देखील माहिती आहे. तर दुसरीकडे काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख निवडणूकच्या रिंगणात असल्याचं ठामपणे सांगत आहे. जर काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला पाठिंबा दिला तर उमेदवार हर्षजीत देशमुख यांची काय भूमिका असेल? याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

दवाखान्यात राहून मैदानात आहे, असे शब्द वापरणे योग्य नाही दरम्यान, या सर्व घडामोडींबाबत काँग्रेसचे माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख यांना विचारले असता ते म्हणाले कि, ही गोष्ट खरी आहे की आम्ही वंचितच्या उमेदवारासोबत बैठक केलेली आहे. आम्ही सगळ्या गोष्टी तपासूनच उमेदवाराला सांगितले की तुम्ही जर सक्षम असाल तरच आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ, असं आम्ही त्यांना कळिवले आहे. हर्षदीप देशमुख म्हणतात मी मैदानात आहे. यावर डॉ.सुनील देशमुख म्हणाले की, दवाखान्यात राहून मैदानात आहे, असे शब्द वापरणे योग्य नाही. मैदानात असाल तर इकडे अमरावतीला या तुम्ही रुग्णालयात आहात हे लक्षात ठेवा.

यशोमती ठाकूर यांनी जे काल विधान केले, १५ ते २० कोटी रुपयेमध्ये आमचा उमेदवार मॅनेज झाला, अशी माहिती आहे. त्यावर डॉक्टर सुनील देशमुख म्हणाले की यशोमतीताईकडे काहीतरी पुरावा असेल म्हणूनच त्यांनी हे विधान केलेलं आहे. मी रुग्णालयात दाखल आहे. हे पक्षाने समजून घ्यावं – हर्षजीत देशमुख दुसरीकडे, हर्षजीत देशमुख अमरावती विधान परिषदेत निवडणुकीच्या मैदानातून माघार घ्यायला तयार नाहीत. काँग्रेस पक्षाने जरी वंचित बहुजन आघाडी किंवा इतर दुसऱ्या उमेदवाराला आपला पाठिंबा जाहीर केला, तरी मी निवडणुकीच्या मैदानातून हटणार नाही. तब्येतीच्या कारणावरून मी रुग्णालयात दाखल आहे.

# तरुण शेतकऱ्याची बिबट्याशी थरारक झुंज

## बिबट्याला जिवंत पकडून दिले वनविभागाच्या ताब्यात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***जळगाव*** – जामनेर तालुक्यातील शहापूर येथे एका तरुण शेतकऱ्याने धाडस आणि प्रसंगावधान दाखवत बिबट्याशी झुंज देऊन त्याला जिवंत पकडल्याची थरारक घटना घडली आहे. मुकेश नाना डोंगरे असे या धाडसी शेतकऱ्याचे नाव असून, या घटनेत ते जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जामनेर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या या धाडसाचे जिल्हाभरातून कौतुक होत आहे.

बुधवारी दुपारी मुकेश डोंगरे हे शहापूर परिसरातील शेतात पेरणीपूर्व मशागतीची कामे करत होते. यावेळी अचानक एका बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यामुळे काही क्षण भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, न डगमगता मुकेश यांनी बिबट्याशी प्रतिकार करत झुंज दिली आणि त्याला पकडून ठेवले. या झटापटीदरम्यान बिबट्याने पंज्याने वार केल्याने मुकेश जखमी झाले. तरीही त्यांनी धैर्य न सोडता बिबट्याला आवळून धरले. ही घटना पाहून जवळील शेतांमध्ये काम करणारे इतर शेतकरी मदतीसाठी धावून आले. त्यांनीही बिबट्याला नियंत्रित ठेवण्यासाठी सहकार्य केले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद करून वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले. जखमी मुकेश डोंगरे यांना तातडीने जामनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# भारताचा दिग्गज नेमबाज हरपला!

**मनू भाकरचे प्रशिक्षक जसपाल राणा यांचे निधन, ४९ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – भारतीय नेमबाजी क्षेत्रातील दिग्गज नेमबाज आणि माजी आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचे वयाच्या ४९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे भारतीय क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे.

नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष कालिकेश नारायण सिंह देव यांनी ही माहिती दिली. गुरुवारी रात्री दिल्लीतील मॅक्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारतीय पिस्तूल नेमबाजांचे उच्च-कार्यक्षमता प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेले राणा नुकतेच जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या खडडऋ वर्ल्ड कप स्पर्धेतून परतले होते. मात्र, परतीच्या प्रवासादरम्यान त्यांची प्रकृती बिघडली. दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले, मात्र त्यांची प्रकृती सुधारली नाही. हृदयविकाराच्या समस्येनंतर निधन म्युनिक येथे झालेल्या खडडऋ वर्ल्ड कप स्पर्धेतून परतताना जसपाल राणा यांची प्रकृती बिघडली होती. दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पुनर्भरणाची व्यवस्था करा! पावसाच्या पाण्याबाबत बीएमसी आयुक्त अश्विनी भिडे यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***मुंबई*** – यंदा पावसाचे आगमन लांबणीवर पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर विहिरींची स्वच्छता करत पिण्या व्यतिरिक्त वापर करण्यासाठी प्रोत्साहित करावे, पावसाच्या पाण्याच्या पुनर्भरणाची व्यवस्था उभारावी, असे निर्देश मुंबई महापालिका



आयुक्त अश्विनी भिडे यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

सिमेंट कॉंक्रीटीकरण पूर्ण झाल्यावर राडारोडा, इतर साहित्य, रस्तेरोधक (बॅरिकेड्स) तातडीने हटवावेत, खड्डेमुक्त रस्त्यांसाठी सिमेंट कॉंक्रीकटचे रस्ते करण्यावर भर दिला आहे. खड्ड्यांची तक्रार प्राप्त होताच २४ तासांत बुजवा, असे निर्देश त्यांनी दिले. अपघातांची संख्या कमी करण्यासाठी आराखडा तयार करा, असे निर्देश त्यांनी दिले. मुंबईतील जलसाठ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी पारंपरिक जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन आणि पर्यायी स्त्रोतांचा वापर करणे आवश्यक आहे.

# मुंबईच्या महापौर बाजूला बसल्या असताना किरीट सोमय्या प्रचंड संतापले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – मुंबई महापालिका मुख्यालयातील महापौर दालनात बुधवारी एक अत्यंत नाट्यमय घडामोड पाहायला मिळाली. बनावट जन्म-मृत्यू प्रमाणपत्र घोटाळ्याच्या आढावा बैठकीसाठी आलेले भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या आणि पत्रकार यांच्यात वादावादी झाली. या वादानंतर सोमय्या पत्रकार परिषद सोडून तरातरा निघून गेले. या प्रकरणावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते अखिल चित्रे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत किरीट सोमय्यांवर 'बिनपदाचे सुपर महापौर' म्हणत जोरदार टीका केली आहे.

अखिल चित्रे यांनी एक्सवर एक व्हिडीओ जारी करत म्हटले आहे की, बिनपदाचे 'सुपर महापौर'! मुंबईत एक नवीन पद निर्माण झालंय – 'बिनपदाचे सुपर महापौर' – नाव: किरीट सोमय्या! ना निवडणूक लढवली, ना जनतेने निवडलं, ना कोणतं अधिकृत पद; तरीही महापौर आणि उपमहापौरांच्या बैठकीत ठाण मांडून बसतात आणि सूचना देतात. काम काय? बैठकीत सगळ्यात जास्त बोलणं, पडद्यामागून सूत्र हलवणं आणि जेव्हा मीडियाने जाब विचारला त्याची जागा दाखवली तेव्हा 'सुपर महापौर' साहेबांनी काय केलं? वाघ बनून बसलेले... कोल्ह्यासारखे पळाले, असे म्हणत त्यांनी किरीट सोमय्या यांच्यावर निशाणा साधलाय.

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४५१/२०२६** **ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती शिला सुभाष बोंदरकर, वय अं.७५ वर्ष, धंदा-घरकाम, २) अमोल सुभाष बोंदरकर, वय अं.३९ वर्ष, धंदा- मजुरी, ३) अभिजीत सुभाष बोंदरकर, वय अं.३२ वर्ष, धंदा- मजुरी, सर्व रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुभाष तुळशिराम बोंदरकर, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# समन्वय वाढवण्यास दर २ महिन्यांनी बैठक : इंडिया आघाडीचा निर्णय




(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***नवी दिल्ली*** – इंडिया आघाडीतील प्रमुख घटक पक्षांची बैठक कॉन्स्टिट्यूशन क्लब येथे सोमवारी पार पडली. आपसात समन्वय वाढवण्यासाठी दर दोन महिन्यांनी बैठका घेतल्या जाव्यात असे या बैठकीत ठरले. मतदारयाद्यांच्या सखोल तपासणीबाबत सरन्यायाधीशांना पत्र लिहिण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. निवडणुकीतील व्होट चोरीबाबतही त्यांच्याकडे तक्रार केली जाणार आहे. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. देशाची गंभीर आर्थिक स्थिती, बेरोजगारी, महागाई वाढत आहे, त्याचबरोबर शेतकऱ्यांचे मुद्दे आणि अन्य महत्त्वाच्या विषयांबाबत सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली पाहिजे. द्रमुक आणि आम आदमी या दोन प्रमुख पक्षांनी बैठकीकडे पाठ फिरवली.

# एसटी कर्मचाऱ्यांचे राज्यभर बेमुदत धरणे आंदोलन

## २९ जूनपासून चक्काजाम आंदोलनाला सुरुवात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – एसटी महामंडळासाठी शासनाने स्वतंत्र बजेट तरतूद करावी. एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन द्यावे, अशा विविध मागण्यांसाठी एसटी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीने बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. २९ जूनपासून राज्यभर बेमुदत धरणे आणि चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे.




राज्यातील बहुसंख्य एसटी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीची बैठक परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत पार पडली. त्यात एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक व कामगार हिताच्या प्रश्नांवर चर्चा झाली. मात्र मागण्यांबाबत समाधान न झाल्याने संघटनांनी तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर २९ जूनपासून मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालय, सर्व विभागीय कार्यालये तसेच सर्व मध्यवर्ती कार्यशाळांवर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शासनाने एसटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी जोरदार मागणी कृती समितीने केली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या मुख्य मागण्या एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन द्यावे. २०१६-२०२० या वेतनकराराच्या पॅकेजदरम्यान १ टक्क्याने कमी करण्यात आलेला वार्षिक वेतनवाढीचा दर २०१६ पासून मान्य केल्याप्रमाणे पुन्हा ३ टक्के करण्यात यावा. औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानुसार २०१८ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकी तातडीने अदा करावी. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५८ टक्के महागाई भत्ता लागू करावा. एसटी महामंडळासाठी शासनाने स्वतंत्र बजेट तरतूद करावी. मध्यवर्ती कार्यशाळांना नवीन बसबांधणीसाठी चॅसिस उपलब्ध करून स्वमालकीच्या बसेस तयार कराव्यात.




# पुणे-मिरज रेल्वे मार्गावर २१ दिवसांचा मेगाब्लॉक

## दुहेरीकरणाच्या कामासाठी रेल्वे प्रशासनाचा मोठा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कराड** -पुणे-मिरज रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या अंतिम टप्प्यातील कामाला वेग आला असून नीरा रेल्वे स्थानक येथे इंटरलॉकिंगची महत्त्वाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने आजपासून तब्बल २१ दिवसांचा मेगाब्लॉक जाहीर केला आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा आणि पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांना काही दिवस गैरसोयीचा सामना करावा लागणार आहे.



काही गाड्या विलंबाने धावणार असल्याची माहिती रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य गोपाल तिवारी यांनी दिली.

या निर्णयामुळे कोल्हापूर-पुणे डेमू (११४२६) ही गाडी १६, २२ आणि २३ जून रोजी सातारा स्थानकापर्यंतच धावणार आहे. तर १९ आणि २५ जून रोजी ही गाडी लोणंद स्थानकापर्यंतच चालविण्यात येईल. पुणे-कोल्हापूर डेमू (११४२५) ही गाडी २४ जून रोजी पुण्याऐवजी सातारा स्थानकावरून सुटेल, तर १९ आणि २५ जून रोजी ती लोणंद येथून रवाना होईल.

# महिलांचा महासंग्रामही सुरु : इंग्लंड-श्रीलंका लढतीने टी-२० विश्वचषक स्पर्धेला आजपासून प्रारंभ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**एजबॅस्टन** - एकीकडे अमेरिकेत फिफा विश्वचषकाचा थरार सुरू झालेला असतानाच इंग्लंडमध्ये शुक्रवारपासून महिलांच्या महासंग्रामास प्रारंभ होईल. महिलांच्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे १०वे पर्व यंदा १२ जून ते ५ जुलै या कालावधीत इंग्लंड आणि वेल्स येथे आयोजित करण्यात येणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री ११ वाजता यजमान इंग्लंड विरुद्ध श्रीलंका लढतीने टी-२० विश्वचषकाला प्रारंभ झाला.



विश्वचषकाचे बिगुल वाजेल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात खेळणारा भारतीय महिला संघ रविवारी पाकिस्तानविरुद्ध पहिला सामना खेळणार आहे. २००९पासून महिलांच्या टी-२० विश्वचषकाला प्रारंभ झाला. आतापर्यंतच्या नऊ पर्वांमध्ये तब्बल सहा वेळा ऑस्ट्रेलियाने जेतेपद पटकावले आहे, तर इंग्लंड, वेस्ट इंडिज व न्यूझीलंड यांनी प्रत्येकी एकदा विश्वचषक उंचावला आहे.

# संत्रा निर्यातीवरील अनुदान सरकारकडून रद्द

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध सध्या तणावपूर्ण असतानाच, महाराष्ट्र सरकारने संत्रा निर्यातीला चालना देण्यासाठी सुरू केलेली प्रोत्साहनपर योजना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मार्केटिंग विभागाने जारी केलेल्या नुकत्याच दिलेल्या आदेशानुसार, राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सुरू करण्यात आलेली ही योजना अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरली आहे. २०२३ मध्ये या योजनेला मंजुरी देताना, सरकारने बांगलादेशात भरावे लागणाऱ्या आयात शुल्काच्या ५० टक्के रक्कम प्रोत्साहनपर अनुदान म्हणून देण्यासाठी १६९.६० कोटी रुपयांची तरतूद केली होती. सरकारने काढलेल्या शासन निर्णयानुसार, काही लोकप्रतिनिधींनी ही योजना रद्द करण्याची आणि निर्यातदारांना दिले जाणारे अनुदान थांबवण्याची मागणी केली होती. या विषयावर १४ मे रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली.

# पेपर फुटल्यास दहा हजारांची नुकसानभरपाई द्यावी

## कॉकरोच जनता पार्टीची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** - परीक्षेचा पेपर फुटल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला शासनाकडून दहा हजार रुपये आर्थिक नुकसानभरपाई मिळावी, परीक्षा आयोजित करण्यासाठी निविदा घेणाऱ्या कंपन्यांचे कडक ऑडिट व्हावे, मंत्र्यांच्या नातलगांना वा जवळच्या मित्रांना अशा निविदा मिळता कामा नयेत तसेच एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकातून वगळलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी साम्राज्याचा नकाशा' पुन्हा समाविष्ट करण्यात यावा, यासह अन्य मागण्यांचे ठराव कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात गुरुवारी मांडण्यात आले.



विद्यार्थ्यांचा एकच आवाज; शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा आज, युवा एकता झिंदाबाद, अशा घोषणा देत 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या बॅनरखाली एकवटलेल्या हजारो विद्यार्थी व युवकांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा परिसर गुरुवारी दणाणून सोडला.

'नीट' परीक्षेतील पेपरफुटी आणि सीबीएसई परीक्षांमधील गोंधळावरून देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, या मागणीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या वतीने अभिजीत दीपके आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते डॉ.विश्वंभर चौधरी, ॲडअसीम सरोदे, नामदेवराव जाधव यांच्यासह पुण्याच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मंडळींनी सहभाग घेतला. त्याचबरोबर विद्यार्थी, विद्यार्थिनीही यात मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विद्यार्थ्यांसह ज्येष्ठांचाही लक्षणीय सहभाग दुपारी चारच्या सुमारास आंदोलनाला सुरुवात झाली. विद्यार्थी, विद्यार्थिनींबरोबरच ज्येष्ठांचाही यातील सहभाग उठून दिसत होतात. विद्यार्थ्यांच्या हातात असलेल्या फलकांवरील मजकूर प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत होता.

पेपर लीक सरकार, लीक इन इंडिया, आमचे भविष्य आमचा अधिकार, सर्वांना शिक्षण, सर्वांना काम, असा आशय या फलकांवर लिहिलेला होता.







